## NSE

## नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लि.

नोंदणीकृत कार्यालयः ''एक्स्चेंज प्लाझा'', सी-१, ब्लॉक-जी, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१, महाराष्ट्र, भारत.

### जाहीर नोटीस

**सेबी (इक्विटी शेअर्सचे डिलिस्टिंग) नियमन, २०२१ चे नियमन ३२ (५) (ए) च्या परिभाषेमध्ये कंपन्यांच्या इक्विटी शेअर्सच्या अनिवार्य डिलिस्टिंगसाठी जाहीर नोटीस.**

याद्वारे सूचना देण्यात येते की सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (इक्विटी शेअर्सचे डिलिस्टिंग) नियमने, २०२१ चे नियमन ३२ (५) (ए) (''डिलिस्टिंग नियमने''), सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट (नियमने) अधिनियम, १९५६ चे कलम २९ए, सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट (नियमने) नियमन, १९५७ आणि उप-विधी आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडची ('एक्स्चेंज') नियमने यांच्या परिभाषेमध्ये **नोव्हेंबर ११, २०२४** पासून पुढील कंपनीचे इक्विटी शेअर्स डिलिस्ट करण्यात आलेले आहेत.

**अनुपालन न केल्याने अनिवार्यपणे डिलिस्ट झालेली कंपनी.**

| कंपनीचे नाव न नोंदणीकृत कार्यालयीन पत्ता* | वाजवी मूल्य (रु.प्रति शेअर) | प्रवर्तकांचे नाव | प्रवर्तकांचा पत्ता* |
|---|---|---|---|
| जिंदल कोटेक्स लिमिटेड गाव मंडियाला कलां, तहसील खन्ना जिल्हा लुधियाना - १४१४१२ | (२३.२६)/- | संदीप जिंदल | क्र-९८०, २ए दीप नगर वॉर्ड, क्र ७० लुधियाना, पंजाब - १४१००१, भारत. आणि घर क्र. बी-१ ९८०/२ए, पोलिस लाईन्स, सिव्हिल लाईन्स, लुधियाना, पंजाब - १४१००१, भारत. |
| | | राजिंदर कुमार जिंदल | घर क्र. २९-डी, सरभ नगर, लुधियाना, पंजाब - १४१००१, भारत. |
| | | रमेश कुमार जिंदल | जिंदल फाईन इंडस्ट्रीज, जीएफ-९ अन्सल टॉवर, ३८ नेहरू प्लेस, दिल्ली - ११००१९, भारत. आणि घर क्र. डी-४०, ग्रेटर कैलाश - २, नवी दिल्ली - ११००४८, भारत. |
| | | यश पॉल जिंदल | घर क्र. बी-१ - ९८०/२ए, पोलिस लाईन्स समोर, सिव्हिल लाईन्स, लुधियाना, पंजाब - १४१००१. भारत. |

*एक्स्चेंजच्या नोदींप्रमाणे उपलब्ध पत्ता

**टीप:**

सेबी (समभागांचे असूचीकरण) नियमने, २०२१ च्या अनुसार, सक्तीच्या असूचीकरणाच्या परिणामांमध्ये खाली दिलेल्या बाबींचा समावेश आहे:

ए. डिलिस्टिंग नियमनांच्या नियमन ३४ (१) च्या परिभाषेमध्ये, कंपनी, तिचे पूर्ण-वेळ संचालक, सिक्युरिटीज कायद्यांचे अनुपालन करण्यासाठी जबाबदार व्यक्ती, आणि त्यांच्यापैकी कोणाकडूनही प्रवर्तन करण्यात येणाऱ्या कंपन्या हे अशा डिलिस्टिंगच्या तारखेपासून दहा (१०) वर्षांच्या कालावधीसाठी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सिक्युरिटीज मार्केट हाताळू शकणार नाहीत किंवा कोणत्याही इक्विटी शेअर्सचे लिस्टिंग करू शकणार नाहीत किंवा सिक्युरिटीज मार्केटमध्ये मध्यस्थ म्हणून काम करू शकणार नाहीत.

बी. वाजवी मूल्य पॉझिटिव्ह (सकारात्मक) असणाऱ्या कंपनीच्या बाबतीत-

i. सदर कंपनीचे प्रवर्तक हे या संबंधित मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजद्वारे प्रमाणित करण्यात आल्याप्रमाणे, या नियमनांच्या नियमन ३३ च्या उप-नियमन (४) चे अनुपालन करून सार्वजनिक भागधारकांना निर्गमन (एक्झिट) पर्याय प्रदान करेपर्यंत, सदर कंपनी व डिपॉझटरीज हे प्रवर्तकाद्वारे/प्रवर्तक समूहाद्वारे समूहाद्वारे धारण करण्यात आलेल्या कोणत्याही इक्विटी शेअर्सचे विक्री, तारण, इत्यादींद्वारे हस्तांतरण करू शकणार नाहीत आणि प्रवर्तक /प्रवर्तक समूहाद्वारे धारण करण्यात आलेल्या सर्व इक्विटी शेअर्ससाठी लाभांश, हक्क, बोनस शेअर्स, विभाजन इत्यादींसारखे कॉरपोरेट लाभ गोठवण्यात येतील.

ii. खंड (ए) मध्ये उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे निर्गमन पर्याय प्रदान करेपर्यंत, अनिवार्य डिलिस्टेड कंपनीचे प्रमोटर, पूर्ण-वेळ संचालक, आणि सिक्युरिटीज कायद्यांच्या अनुपालनासाठी जबाबदार व्यक्ती हे कोणत्याही सूचीबद्ध कंपनीचे संचालक होण्यासाठी पात्रदेखील असणार नाहीत.

सी. सार्वजनिक भागधारकांना बाहेर पडण्याचा मार्ग देण्याची जबाबदारी कंपनीच्या प्रवर्तकांची आहे.

डी. डिलिस्टिंग नियमनांच्या नियमन ३३ (४) च्या परिभाषेमध्ये, कंपनीचा (चे) प्रवर्तक सार्वजनिक भागधारकांना त्यांचे शेअर्स बाळगण्याच्या पर्यायाच्या अधीन राहून, मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजमधून डिलिस्टिंगच्या तारखेच्या तीन महिन्यांच्या आत, व्हॅल्यूअरद्वारे निश्चित करण्यात आलेले मूल्य प्रदान करून सार्वजनिक भागधारकांकडून डिलिस्टेड इक्विटी शेअर्सचे संपादन करेल.

ई. डिलिस्टिंग नियमनांच्या नियमन ३३ (५) च्या परिभाषेमध्ये, नियमन ३३ च्या उप-नियमन (३) च्या परिभाषेमध्ये प्रदेय असणारी किंमत ही उप-नियमन (४) अंतर्गत नमूद कालावधीच्या आथ सर्व भागधारकांना प्रदान करण्यात न आल्यास, अनिवार्य डिलिस्टिंग प्रस्तावाच्या अंतर्गत ज्यांनी आपले शेअर्स देऊ करतात, त्या सर्व भागधारकांना प्रतिवर्ष दहा टक्के दराने व्याज प्रदान करण्यासाठी प्रवर्तक उत्तरदायी असेल.

**कोणत्याही शंका डिलिस्टिंग समितीकडे पाठवण्यात येऊ शकतात, लिस्टिंग विभाग, नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड, एक्स्चेंज प्लाझा, सी-१, ब्लॉक-जी, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. संपर्क क्र.:+९१ २२ २६५९८१०० (३२०१४), ई-मेल: vgandhi@nse.co.in, delisting@nse.co.in with cc to dl-insp-enf-delisting@nse.co.in.**

शंका वर नमूद ईमेल अॅड्रेसवर अनिवार्यपणे ईमेल करायला हव्यात. कोणत्याही निनावी शंका विचारात घेण्यात येणार नाहीत.

**स्थळ: मुंबई**
**दिनांक: ३० जानेवारी, २०२५**

**नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडसाठी व त्यांच्या वतीने**

Nifty50

---

प्रपत्र क्र. ३
[नियम-१५(१)(ए) पहा)]/ १६(३)

**कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी १)**
२रा मजला, कुलाबा, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई-४००००५
(५वा मजला, सिंधिया हाऊस, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१)

**खटला क्र.: ओए/३२५/२०२४**
**कर्ज वसूली न्यायाधिकरण(कार्यवाही) रुल्स, १९९३ च्या नियम ५ च्या उप-नियम (२ए) सहवाचता अॅक्टच्या कलम १९ च्या उप-कलम(४) अंतर्गत समन्स.**

**परि. क्र.: १२**

**आयडीबीआय बँक**
**विरुद्ध**
**स्टेलामेरी कनकराज**

प्रति,

**(१) स्टेलामेरी कनकराज**
डी/डब्ल्यू/एस/ओ- मेरी
१०७, सीटीएस ९२ इमारत ए-३ पिंपरीपाडा एकेव्ही मार्गाच्या लगत, जेरी वर्गीसच्या समोर, मालाड पूर्व, मुंबई -४०००९७
येथे सुद्धा
बी २०४ इमारत क्र. ३ कांती अथर्व सेंट्रल पार्क अथर्व सोसायटी, सफाळे पश्चिम, पालघर, पालघर, महाराष्ट्र - ४०११०२

**(२) एलिझाबेथ कनकराज**
१०७, सीटीएस ९२ इमारत ए-३ पिंपरीपाडा एकेव्ही मार्गाच्या लगत, जेरी वर्गीसच्या समोर, मालाड पूर्व, मुंबई -४०००९७
येथे सुद्धा
बी २०४ इमारत क्र. ३ कांती अथर्व सेंट्रल पार्क अथर्व सोसायटी, सफाळे पश्चिम, पालघर, पालघर, महाराष्ट्र - ४०११०२

**समन्स**

ज्याअर्थी, वरील नमूद ओए/३२५/२०२४ नामदार प्रबंधक/पीठासिन अधिकाऱ्यांसमोर **१९/१२/२०२४** रोजी सूचीबद्ध केला होता.

**ज्याअर्थी,** नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. २७०९७५१/-** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या अॅक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).

अॅक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या तीस दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;

(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;

(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.

(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **१७/०४/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व प्रबंधकांसमोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

**माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक: २०/१२/२०२४ रोजी दिले.**

**समन्स जारी करण्याकरीता प्राधिकृत अधिकारांची स्वाक्षरी**
**सही/-**
**प्रबंधक**
**डीआरटी-I, मुंबई**

**टीप: प्रयोज्य नसेल ते वगळावे.**

---

**राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणात**
**मुंबई खंडपीठ**
**कंपनी योजना याचिका क्र. २२७ सन २०२४**
**मधील**
**कंपनी योजना याचिका क्र. ११ सन २०२५**
**(कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम २३० ते २३२)**

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ आणि इतर प्रयोज्य तरतुदींच्या प्रकरणात.
आणि
च्या प्रकरणात:

**गोपानी इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड,** कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदींच्या अंतर्गत स्थापित कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे, सदर खंडपीठाच्या वरील सदर अधिकारितेमधील महाराष्ट्र राज्यातील २ उत्तम हाऊस, पी. डी'मेलो रोड, कर्नाक बंदर, मुंबई-९, महाराष्ट्र.
**CIN: U51900MH1994PTC080487**

**...याचिकाकर्ता कंपनी क्र. १/ हस्तांतक कंपनी**

**गोपानी आयर्न अॅण्ड पॉवर (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड,** कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदींच्या अंतर्गत स्थापित कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे, सदर खंडपीठाच्या वरील सदर अधिकारितेमधील महाराष्ट्र राज्यातील ए-२२, एमआयडीसी, ग्रोथ सेंटर, पोस्ट टडाली, जिल्हा चंद्रपूर, महाराष्ट्र.
**CIN: U74600MH1988PTC046932**

**...याचिकाकर्ता कंपनी क्र. २/ हस्तांतरिती कंपनी/विभक्त कंपनी**

**वाय अॅण्ड एम सिमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड,** कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदींच्या अंतर्गत स्थापित कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे, सदर खंडपीठाच्या वरील सदर अधिकारितेमधील महाराष्ट्र राज्यातील २ उत्तम हाऊस, पी. डी'मेलो रोड, कर्नाक बंदर, मुंबई-९, महाराष्ट्र.
**CIN: U26940MH2006PTC161339**

**...याचिकाकर्ता कंपनी क्र. ३/ नवीन कंपनी**

**याचिकेची सूचना**

गोपानी इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड (याचिकाकर्ता कंपनी क्र. १), गोपानी आयर्न अॅण्ड पॉवर (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (याचिकाकर्ता कंपनी क्र. २) आणि वाय एम सिमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (याचिकाकर्ता कंपनी क्र. १) च्या एकत्रिकरणाच्या योजनेच्या मंजुरीकरिता कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० आणि २३२ अंतर्गत याचिका १५.०१.२०२५ रोजी याचिकाकर्त्यांद्वारे सादर करण्यात आली होती आणि सदर याचिका दाखल करण्यात आली आणि सदर याचिका २१.०२.२०२५ रोजी राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठासमोर अंतिम सुनावणीकरिता निश्चित करण्यात आली आहे. कोणीही व्यक्ती सदर याचिकेच्या बाजूने किंवा विरोध करण्यास इच्छुक असल्यास याचिकेच्या सुनावणीकरिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर याचिकाकर्त्यांच्या वकिलांकडे पोहोचेल अशा पध्दतीने त्यांचे नाव आणि पत्त्यासह त्यांच्या किंवा त्यांच्या वकिलांद्वारे सही केलेली त्यांच्या हेतुची सूचना याचिकाकर्त्यांच्या वकिलांकडे पाठविणे आवश्यक आहे. जेथे त्यांना याचिकेला विरोध करायचा आहे, विरोधाची पार्श्वभूमी किंवा शपथपत्राची प्रत अशा सूचनेसह पाठविणे आवश्यक आहे. याचिकेची प्रत कोणाही व्यक्तीला आवश्यकता असल्यास त्यासाठी विहित प्रभार प्रदान केल्यावर निम्नस्वाक्षरीकारांद्वारे पुरविण्यात येईल.

दिनांक: २९.०१.२०२५

सही/-
अॅड. अक्षय गोसावी
(एस अॅण्ड टी लिगल)
२०३, सेंटर पॉईंट प्रिमायसेस,
११०, डॉ. आंबेडकर रोड, भारत माता सिनेमाजवळ, लालबाग, मुंबई-४०००१२.

---

## जाहीर सूचना

**सूचना** याद्वारे सर्व संबंधित व्यक्तींस देण्यात येते की, माझे अशिल **श्री. मोतीलाल विठ्ठलदास पांचाल,** सद्यस्थितीतील मालक, यांनी फ्लॅट क्र. बी-५३, ''तिसरा मजला, बी-विंग, हिरा मोती नगर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., शिवाजी नगर, रस्ता क्र. ३, वागळे इस्टेट, ठाणे (प.) - ४००६०४'' हा पुढील व्यक्तींना विक्री करण्यास सहमती दर्शवली आहे: **१) श्री. सुंदर राजू कुलाल आणि २) श्रीम. सरिता सुंदर कुलाल,** सदर फ्लॅटच्या विक्री व शेअर हस्तांतरणासाठी दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी करारनामा करण्यात आला असून, तो दि. ०२/०१/२०२५ रोजी दस्तऐवज स्वीकृती क्र. टीएनएन९-१३४-२०२५ अन्वये नोंदणीकृत करण्यात आला आहे, तसेच करारात नमूद केल्याप्रमाणे काही रक्कम प्राप्त झाली आहे.

याआधी, दिनांक ०९ ऑक्टोबर, १९९१ रोजीच्या करारानुसार, **श्री. शिवस्वरूप बी. शर्मा आणि श्री. अनिल एस. शर्मा** यांनी करारातील संपूर्ण व अंतिम मोबदला मिळाल्यानंतर सदर फ्लॅट क्र. बी-५३ चा ताबा **श्री. मोतीलाल विठ्ठलदास पांचाल** यांना हस्तांतरित केला होता. सदर करार ठाणे शहरातील मुद्रांक संकलक यांच्या आदेशानुसार विधिपूर्वक मुद्रांकित करण्यात आला होता.

**श्री. शिवस्वरूप बी. शर्मा व श्री. अनिल एस. शर्मा** यांनी दिनांक १५ सप्टेंबर, १९८६ रोजी **''मे. आर. के. बिल्डर्स''** यांच्याकडून सदर फ्लॅट क्र. बी-५३ खरेदी केला होता. तथापि, **''मे. आर. के. बिल्डर्स'' आणि श्री. शिवस्वरूप बी. शर्मा व श्री. अनिल एस. शर्मा** यांच्यात दिनांक १५ सप्टेंबर, १९८६ रोजी झालेला विधिपूर्वक मुद्रांकित मालकी करार हरवलेला किंवा गहाळ झालेला आहे. या संदर्भात **श्री. मोतीलाल विठ्ठलदास पांचाल** यांनी ठाणे शहरातील श्रीनगर पोलीस ठाण्यात हरवलेल्या मालमत्तेची तक्रार नोंदवली असून, त्याची नोंद ''हरवलेली मालमत्ता नोंदणी क्र. ०१४०/२०२५'' दिनांक २३/०१/२०२५ अन्वये करण्यात आली आहे. सर्व किंवा कोणत्याही व्यक्तींनी सदर सद्यस्थितीतील मालकाचे हक्क, नामाधिकार व स्वारस्य याची नोंद घ्यावी.

सर्व व्यक्ती/किंवा संबंधित अधिकारी यांना सदर फ्लॅट किंवा त्यातील कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, वारसा, गहाण, ताबा, भेट, माडेपट्टी, धारणाधिकार, तारण, विश्वस्त, परवाना, देखभाल, सुविधाधिकार, कर आकारणी किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असल्यास, त्यांनी प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आवश्यक पुराव्यांसह लेखी स्वरूपात खालील पत्त्यावर कळवावे. जर कोणताही दावा दिलेल्या मुदतीत प्राप्त झाला नाही, तर सदर फ्लॅट क्र. बी-५३ वर कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क किंवा दावा नाही असे गृहित धरले जाईल आणि त्यानंतर प्राप्त होणारा कोणताही दावा अमान्य मानला जाईल.

**वकील एस.ई. क्षीरसागर**
युनिट क्र. १११, २रा मजला, न्यू मोडेला सीपीएस लि., पडवळ नगर, वागळे इस्टेट,
ठाणे (पश्चिम) - ४००६०४.
मो. क्र.: ९८९२८६९५७८

---

**बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**

**रिजनल स्ट्रेस्ड अॅसेट रिकव्हरी ब्रांच, एमएमडब्ल्युआर, ६वा मजला, बडोदा हाऊस, दिवाण शॉपिंग सेंटरच्या मागे, एसव्ही रोड, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२.**
**ईमेल : sarmmw@bankofbaroda.co.in**

{नियम ८(१)}

**कब्जा सूचना** (स्थावर मिळकतीकरीता)

**ज्याअर्थी,**

निम्नस्वाक्षरीकार हे बँक ऑफ बडोदाचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक ०३/१०/२०१९ रोजी एक मागणी सूचना जारी करून कर्जदार **श्री. अखिलेश्वर झा, गोपीनाथ झा यांचा मुलगा, मे. एजी फार्मा चे मालक आणि हमीदार सौ. प्रिती झा** यांना सूचनेत नमूद केलेली रक्कम म्हणजेच **रु. ६२,५०.२९५.१०/- (रुपये बासष्ट लाख पन्नास हजार दोनशे पंच्याण्णव आणि दहा पैसे मात्र) ३०.०९.२०१९ रोजीस च्यासह देयाच्या अंतिम तारखेपर्यंत सांपार्श्विक दराने त्यावरील पुढील व्याज अधिक परिव्यय, प्रभार आणि खर्च** या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील वर्णन मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा सदर अॅक्टच्या कलम १३ च्या उप कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ह्या **२९ जानेवारी, २०२५** रोजी घेतला.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, उक्त मिळकतीशी व्यवहार करू नये व सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा बँक ऑफ बडोदाच्या रक्कम **रु. ६२,५०.२९५.१०/- (रुपये बासष्ट लाख पन्नास हजार दोनशे पंच्याण्णव आणि दहा पैसे मात्र) ३०.०९.२०१९ रोजीस च्यासह देयाच्या अंतिम तारखेपर्यंत सांपार्श्विक दराने त्यावरील पुढील व्याज अधिक परिव्यय, प्रभार आणि खर्चाच्या अधीन राहील.**

तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात अॅक्टच्या कलम १३(८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे/जामीनदाराचे/गहाणदाराचे लक्ष वेधून घेतले जात आहे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन :**

१. तळमजला, सर्व्हे क्र.४५, प्लॉट क्र. ०५, जेएस अपार्टमेंट, लोकमान्य नगर, नवली, पालघर येथे स्थित, दुकान क्र. ०४, मोजमापित २६५ चौ. फू., बिल्ट अप क्षेत्र च्या समाविष्टीत मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग.

सीमाबद्ध :
उत्तर: जगदंबा किराणा
दक्षिण: गाला क्र. ०३
पूर्व: प्रथमेश को-ऑप हाउसिंग सोसायटी
पश्चिम: गुरुनाथ को-ऑपरेटिव्ह हौउसिंग सोसायटी

**दिनांक : २९.०१.२०२५**
**ठिकाण : पालघर**

**विनय भुषण**
**मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी**

---

**परिशिष्ट IV-A**
**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम 2002 चा नियम 8(6) आणि नियम 9(1)च्या नियमांना सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्सट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई- लिलावाची विक्री सूचना.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषत: कर्जदारांना तसेच हमीदारांना सूचीत करण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदात्यांनी गहाण केली गेली होती त्या मालमत्तेवर सुरक्षित कर्जदात्याच्या प्राधिकृत अधिकारीने **सम्मान कॅपिटल लिमिटेड (पूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळखले जायचे) [CIN : L65922DL2005PLC136029] (''सुरक्षित कर्जदार'')** तर्फे **प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे. ज्याचा **17.02.2025** रोजी **संध्याकाळी 04.00 ते 05.00** पर्यंत **''जेथे आहे'', ''जसे आहे'', आणि ''जे काहीपण आहे''**, ची वसूली साठी **कर्ज खाते नं. HHLPUN00439975** साठी **रु. 2,18,63,381/- (रुपये दोन कोटी अठरा लाख त्रेसष्ठ हजार तीनशे एक्याऐंशी फक्त)** उर्वरित मूलधन, उर्वरित (विलंबशुल्क) आणि दिनांक **22.01.2025** पर्यंत व्याज कर्जाच्या अटींनुसार कर्ज करार आणि इतर संबंधित कर्ज दस्तऐवजांच्या संदर्भात लागू भविष्यातील व्याज **23.01.2025** पासून कायदेशीर खर्च किंवा इतर शुल्का सह प्रभावी होऊन जो **विजय बाबुराव अनपत आणि तृप्ती विजय अनपत उर्फ अनपत तृप्ती विजय** यांची मालमत्ता सुरक्षित कर्जदाराच्या द्वारे कर्जाच्या वसूली साठी विकली जाईल.

सदर मालमत्तेच्या लिलावासाठी आरक्षित रक्कम **रु. 1,40,40,000/- (रुपये एक कोटी चाळीस लाख चाळीस हजार फक्त)** आणि अर्नेस्ट मनी डिपॉजिट **(''ईएमडी'') रु. 14,04,000/- (रुपये चौदा लाख चार हजार फक्त)** म्हणजेच अनामत ठेव रक्कम राखीव किंमतीच्या 10% असेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**रिव्हिजन सर्व्हे क्रमांक 5/6डी/2 येथे वसलेल्या जमिनीचे सर्व खंड आणि भूभाग, 4.50 आर मोजमापाचे क्षेत्र, ज्यावर दोन मजली बिल्डिंग बांधली आहे, 206.56 चौरस मीटर्स म्हणजे 2223.41 चौरस फूट मोजमापाचे क्षेत्र + सिद्धनाथवाडी येथे 126.87 चौरस मीटर्स मोजमापाच्या कव्हर्ड पार्किंगसह, तालुका वाई, जिल्हा सातारा, वाई नगरपरिषदेच्या हद्दीत आणि तालुका आणि नोंदणी उप-जिल्हा वाईच्या हद्दीत, जिल्हा आणि नोंदणी जिल्हा सातारा, सातारा - 412803, महाराष्ट्र आणि जे खालीलप्रमाणे बद्ध आहेत :-**

**पूर्व : रस्ता** | **पश्चिम : अण्णा दिनू बागडे यांची मालमत्ता**
**उत्तर : सर्व्हे क्र. 5/6डी/1** | **दक्षिण : रमेश लक्ष्मण खरात आणि इतरांची मालमत्ता**

विक्रीच्या तपशीलवार नियम व अटींसाठी कृपया सुरक्षित कर्जदाराच्या www.sammaancapital.com या वेबसाईटवरील लिंक पाहा; संपर्क क्र. : 0124-6910910, +91 7065451024, ई-मेल : auctionhelpline@sammaancapital.com. बोली लावण्यासाठी, https://assets.matexauctions.com वर लॉग ऑन करा.

**सही/-**
**अधिकृत अधिकारी**
**सम्मान कॅपिटल लिमिटेड**
**(पूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळखले जायचे)**

**तारीख : 23.01.2025**
**स्थळ : सातारा**

---

**pnb Housing Finance Limited** Ghar Ki Baat

**जोडपत्र -IV-ए - स्थावर मिळकती/तीं चा ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना**
**(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) ला परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव-विक्री सूचना)**

**नों. कार्यालय: २वी, २ रा मजला, अमेय पार्क, नवापूर रोड, बोईसर (पश्चिम), महाराष्ट्र ४०१५०१, शाखा ऑफिस: ३०२, तिसरा मजला, रिद्धी आर्केड, १००फूट नारंगी बायपास रोड, बिग बाजार जवळ, विरार (पश्चिम), महाराष्ट्र ४०१३०३, शाखा ऑफिस: ०१, तळमजला, बाबा हाऊस, वेस्टर्न एक्सप्रेस मेट्रो स्टेशन जवळ अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३, शाखा ऑफिस: ऑफिस क्र. ६-बी, पहिला मजला, नील इप्रेस सीएचएसएल, प्लॉट क्र. ९२-९३, सेक्टर १/एस, एचडीएफसी सर्कल जवळ, नवीन पनवेल, महाराष्ट्र ४१०२०६, ऑफिस क्र. २-३, तिसरा मजला, स्वामी तिर्थ इमारत क्र. ५, शेलार पार्क, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण (पश्चिम), महाराष्ट्र ४२१३०१.**
**ई-मेल: auction@pnbhousing.com, वेबसाईट : www.pnbhousing.com**

सर्वसाधारण जनता आणि विशेष करून रकाना क्र. ''ए'' मध्ये दर्शवलेल्या कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यांत येते की, मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/तारणी धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ज्यांचा आन्वयिक/प्रत्यक्ष कब्जा घेतला (रकाना क्र. सी. मध्ये वर्णन केल्याप्रमाणे) त्या तारणी धनकोंकडे गहाण/भाग्रस्त असलेल्या रकाना क्र. डी मध्ये वर्णन केलेल्या खालील स्थावर मिळकती खालील तपशिलांनुसार **''जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे आणि जे काही आहे तेथे आहे तत्वाने''** विकल्या जाणार आहेत. आज मितीस सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या नियम ८(६) व ९ अन्वये रकाना क्र. ए मध्ये दर्शवल्याप्रमाणो जे कोणी असतील त्या संबधित कर्जदार/गहाणदार (मयत असल्यास) कर्जदार/गहाणदार/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), निष्पादक, व्यवस्थापक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारे सूचना देण्यांत येते. विक्रीच्या तपशिलावर अटी आणि शर्तींसाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/तारणी धनकोंची वेबसाईट म्हणजेच **www.pnbhousing.com** मध्ये दिलेली लिंक बघावी.

| कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ कायदेशीर वारस यांचे नाव (ए) | मागितलेली रक्कम आणि तारीख (बी) | कब्जाचे स्वरूप (सी) | गहाण मिळकतीचे वर्णन (डी) | राखीव किंमत (रु. कि.) (ई) | इ. अ. र. (रु. कि. च्या १०%) (एफ) | बोली मात्र करण्याची अंतिम तारीख (जी) | बोली वाढविण्याचा दर (एच) | निरीक्षणाची तारीख आणि वेळ (आय) | लिलावाची तारीख आणि वेळ (जे) | ज्ञात भार/कोर्ट केसेस असल्यास (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एचओयु/बीओएमआर/०११९/६३३६९७ आकाश गंपू मस्के/ मुंजबारी गंपु मस्के शा.का.: बोईसर | रु. १२,९८,९११.४३ आणि ३१.०३.२०२१ | प्रत्यक्ष | फ्लॅट क्र. १०३, बी विंग, १ ला मजला, इमारत क्र. ४, आदिनाथ हाईट्स, कांचन युनिव्हर्स, माहिम रोड, पालघर पश्चिम ठाणे महाराष्ट्र भार